ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# संगमनेर तालुक्याचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग




श्री. राजेंद्र विठ्ठल पानसरे
(संशोधक विद्यार्थी)
डॉ. मच्छिंद्र कारभारी फसले
(प्राचार्य, आबासाहेब काकडे आर्ट्स कॉलेज बोधेगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर)

## प्रस्तावना

इ. स. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेला पुढील काळात राष्ट्रीय चळवळीचे व्यापक स्वरूप प्राप्त झाले. या राष्ट्रीय सभेने पुढील काळात संपूर्ण भारतभरस्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व केले. त्याला सुरुवातीपासून देशभर मोठा पाठिंबा मिळत गेला. संगमनेर हे छोटेसे शहर असले तरी देशभर सुरु असलेल्या विविध चळवळींच्या प्रतिक्रिया संगमनेरमध्ये उमटलेल्या दिसून येतात. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या राष्ट्रीय नेतृत्वाचा तालुक्यावर प्रभाव होता. लोकमान्य टिळकांच्या काळात संगमनेर शहरापुरते मर्यादित असलेले राष्ट्रीय चळवळीचे लोण महात्मा गांधीच्या काळात तालुक्याच्या ग्रामीण भागातही पसरलेले दिसते.

## स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीचे संगमनेरमधील पडसाद

सन १९०५ मधील वंगभंग चळवळीच्या उदयाला बंगाल प्रांताचे विभाजन हेप्रमुख कारण ठरले. ब्रिटीशांचा फाळणी करण्यामागील खरा उद्देश बंगालमधील राष्ट्रवादी चळवळ दडपून टाकणे हा आहे हे कॉंग्रेसमधील तरुण नेतृत्वाच्या नजरेतूनसुटले नाही. ब्रिटीश सरकारकडून बंगालच्या फाळणीचा आदेश जाहीर होताच वंगभंग चळवळीने जोर धरला. बंगालमध्ये प्रचंड प्रक्षोभ उसळला. फाळणीला विरोध म्हणून सभा व मोर्चे सुरु असतानाच राष्ट्रवादी नेत्यांनी परकीय मालावर बहिष्कार घालण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे वंगभंग चळवळीतून स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीचा पाया घातला गेला. सुरवातीला बंगाल प्रांतापर्यंत सीमित असलेली ही चळवळ पुढे देशभर पसरली. विसाव्या शतकातील या पहिल्या जनआंदोलनाचे लोण लवकरच अहमदनगर जिल्ह्यात आणि त्यातील संगमनेर तालुक्यापर्यंत पोहचले. संगमनेरमध्येही माधवराव परशरामी, केशवराव परशरामी व वैजनाथशास्त्री रानडे इत्यादी स्थानिक नेत्यांच्या बरोबरीने काही तरुणांनी स्वदेशी चळवळीच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. या नेत्यांनी काही तरुणांच्या मदतीने संगमनेरमध्ये खादी व स्वदेशीचा प्रचार सुरु केला. त्यामुळे संगमनेरच्या जनतेत राजकीय चळवळीबद्दल जागृती येण्यास सुरुवात झालेली दिसून येते.

## लोकमान्य टिळकांची संगमनेरमध्ये सभा

लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांनी एकत्र येत इस. १९१६ मध्ये 'होमरूल लीग'ची स्थापना केली. ब्रिटिशांकडून 'वसाहतीअंतर्गत स्वातंत्र्य मिळविणे' हा होमरूल लीग स्थापन करण्यामागचा प्रमुख उद्देश होता. अल्पावधीतच देशाच्या अनेक भागांत लीगच्या शाखा स्थापन झाल्या. होमरूल चळवळीच्या प्रचार व प्रसारासाठी लोकमान्य टिळकांकडे मुंबई सोडून इतर महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रांत आणि वऱ्हाड इत्यादी भाग सोपविण्यात आला. लोकमान्य टिळक यांचे प्रचार दौरे सुरु झाले. संगमनेरमधील बापूसाहेब परेगावकर, रामदेवराव नवले, विरचंद्र श्रीचंद्र, टी. के. जोशी, नारायणराव परदेशी या कार्यकर्त्यांनी लोकमान्य टिळकांना संगमनेरमध्ये येऊन मार्गदर्शन करण्याची विनंती केली. लोकमान्य टिळकांनी ही विनंती मान्य केलीव १९ मे १९१७ रोजी सायंकाळी संगमनेर नगरपालिकेच्या

समोरील प्रांगणात सभा घेतली. आपल्या भाषणात टिळकांनी खादी व स्वदेशी वापरण्याचे आवाहन करत लोकांना स्वराज्याचा अर्थ सोप्या भाषेत समजावून सांगितला

## असहकार चळवळीत संगमनेरकरांचा सहभाग

रौलट कायदा, जालियानवालाबाग हत्याकांड, १९१९च्या कायद्यामधील फोलपणा, खिलाफत आंदोलन इत्यादी कारणांमुळे महात्मा गांधी यांनी असहकार आंदोलनाची घोषणा केली. १ ऑगस्ट १९२० रोजी म. गांधींनी स्वतःच्या 'कैसर-ई-हिंद' या पदवीचा त्याग करून असहकाराच्या आंदोलनास सुरुवात केली. संगमनेरमध्येही असहकाराच्या चळवळीच्या निमित्ताने खादी वापराच्या चळवळीने जोर धरला. महात्मा गांधी असहकार चळवळीच्या प्रचारासाठी तसेच टिळक स्वराज्य फंड जमा करण्यासाठी देशभर दौरे काढत होते. महात्मा गांधीनी संगमनेरमध्ये येऊन सभा घ्यावी यासाठी संगमनेरमधील काही तत्कालीन स्थानिक नेते प्रयत्नशील होते यामध्ये काकासाहेब पिंगळे, बापूसाहेब परेगावकर, तुकाराम निऱ्हाळी, गंगाधर दळवी, गणेश सराफ, शिवनारायण नावंदर, शंकरराव संत वकील इत्यादींनी महात्मा गांधीना भेटून संगमनेरला येण्याचे निमंत्रण दिलेमा. गांधींनी हे निमंत्रण मान्य करून ते२१ मे १९२१ रोजी भुसावळ व नाशिक येथील सभांनंतर संगमनेरमध्ये आले. २२ मे १९२१ रोजी नगरपालिकेच्या प्रांगणात त्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेसाठी शहरातील लोकांबरोबरच आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून शेकडो लोक उपस्थित होतेया सभेत बोलताना महात्मा गांधी यांनी 'मला गांधी राज्य नको आहे तर स्वराज्य हवे आहे. त्यासाठी वाईट रूढी प्रथा बंद करा, विदेशी कापड वापरू नका, स्वदेशी वस्तूंचा वापर करा, आणि स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी व्हा असे आवाहन संगमनेरकरांना केले यावेळी टिळक स्वराज्य फंडासाठी चार हजार रुपयांचा निधी जमा झाला. सौ. द्वारकाबाई मोहिनीराज देशपांडे नावाच्या महिलेने आपल्या हातातील एक सोन्याची पाटली काढून गांधीजींकडे सुपूर्त केली. या सभेत संगमनेर नगरपालिकेच्या वतीने गांधीजींना तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले मानपत्र प्रदान करण्यात आले म. गांधीची सभा झालेल्या चौकाला पुढे संगमनेर नगरपालिकेने 'गांधी चौक' असे नाव दिले आहे.

महात्मा गांधींच्या संगमनेरमधील सभेनंतर सर्वत्र उत्साहाचेवातावरण निर्माण झाले. लोक चरख्यावर सुत कातून खादी विणू लागले. शहरातील खत्री गल्लीतील दारूच्या गुत्यावर तरुणांनी निरोधन सुरु केले दारू पिणाऱ्यांना दारू पिऊ नका असे परोपरीने सांगण्यासाठी स्त्रियांनीही पिकेटिंग सुरु केले दारूबंदीवर व्याख्याने देऊन व मिरवणुकीत दारूड्यांची सोंगे काढून दारूबंदी करण्याचे प्रयत्न सुरु झाले. या दारूबंदीच्या चळवळीचा परिणाम होऊन सन १९२४ साली संगमनेर शहरातील दारूबंदी करण्यासाठी शासनाच्या वतीने एक कमिशन नेमण्यात आले. या कमिशनच्या अहवालानुसार संगमनेरमधील एकमेव दारूगुत्ता बंद करण्यात आलायासाठी प्रामुख्याने बाळाजी हरी निऱ्हाळी यांनी विशेष प्रयत्न केले होते.

## सविनय कायदेभंग चळवळीत संगमनेर तालुक्याचा सहभाग

लाहोर येथील कॉंग्रेसअधिवेशनात ब्रिटिशांविरुद्ध सविनय कायदेभंग चळवळ सुरु करण्याचा निर्णय झाला कॉंग्रेसच्या या निर्णयामागे संपूर्ण देश उभा राहिला. २६ जानेवारी १९३० हा दिवस सर्व देशभर 'स्वातंत्र्यदिन' म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी संगमनेरमध्ये प्रवरा तीरावर अनेक सत्याग्रही एकत्र आले या सत्याग्रहींसमोर रामकृष्ण महाराज (लक्ष्मण हरी वऱ्हाडकर) यांनी भाषण करून सर्वांना स्वराज्य संपादनाच्या शपथा दिल्या. या वेळी अवघे १७ वर्षे वय असलेल्या लक्ष्मण अनंतराव देशपांडे या युवकाने पेटीट विद्यालयावर झेंडा लवण्याचा निश्चय केला व पहाटेच्या वेळी पोलिसांचा कडक पहारा चुकवून त्याने पेटीट विद्यालयाच्या कौलारू छतावर चढून जाऊन कॉंग्रेसचा झेंडा फडकवला

सविनय कायदेभंग चळवळीचा महत्वाचा टप्पा असलेल्या दांडी यात्रेतसंगमनेरवरून रामभाऊ उपासनी व धारणकर हे दोन तरुण सहभागी झाले होते. त्यांनी ६ एप्रिल १९३० रोजी दांडी या ठिकाणी झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. त्यामुळे त्यांना काही काळ तुरुंगवासही भोगावा लागला.

दांडी येथील सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर विलेपार्ले येथे महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस समितीने मिठाचा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. या सत्याग्रहात संगमनेरहून बापूसाहेब परेगावकर, गंगाधर दळवी व पांडुरंग मंचरकर यांच्या नेतृत्वाखाली२८ सत्याग्रहींची तुकडी सहभागी झाली होती. या सत्याग्रहात सहभाग घेतल्याबद्दल या तुकडीतील जगन्नाथ रामदयाल नावंदर व हरी पांडू राऊत यांना प्रत्येकी तीन महिने आणि शंकर धोंडीबा गोडसे यांना सहा महिन्याची शिक्षा झाली होती

विलेपार्ले येथे मिठाचा सत्याग्रह सुरु असताना सविनय कायदेभंग चळवळीत अहमदनगर जिल्हा आणि त्यामध्ये संगमनेर तालुका आघाडीवर होता. तालुक्यात गावोगाव प्रभातफेऱ्या काढण्यात आल्या. संगमनेरमध्ये अनेक ठिकाणी सभा व मिरवणुका यांचे आयोजन करण्यात आले. ४ जानेवारी १९३२ रोजी म. गांधीना अटक झाली. त्यांच्या अटकेची बातमी येताच संपूर्ण संगमनेरमध्ये संतापाची लाट उसळली. या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी एक निषेधदर्शक सभा आयोजित करण्यात आली होती. सरकारी अधिकाऱ्यांनी वटहुकुमाच्या आधारे दडपशाही सुरु केली. सभा आणि मिरवणुकांमध्ये भाग घेतल्याबद्दल कन्हैयालाल हिरालाल राठी व सदाशिव शंकर परेगावकर यांना प्रत्येकी सहा-सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा आणि १५० रुपयांचा दंडही करण्यात आला. या सभा व मिरवणुकांमध्ये भाषण केल्याबद्दल रामचंद्र महादेव संगमनेरकर यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली ४ महिन्यांची शिक्षा होऊन त्यांना येरवडा येथील तुरुंगात पाठविण्यात आले. सभा, मोर्चे व मिरवणुका याबरोबर संगमनेरमध्ये परदेशी कापडाच्या बहिष्कारीची चळवळ सुरु झाली परदेशी कापडांच्या दुकानांसमोर पिकेटिंग सुरु करण्यात आले सरकारने परदेशी कापडावर बहिष्कार प्रचारात भाग घेतल्याबद्दल तालुक्यातील अनेकांना अटक केली.

## संगमनेर तालुक्यातील जंगल सत्याग्रह

मिठाचा कायदा मोडण्याचा कार्यक्रम सबंध मे महिन्यात ठिकठिकाणी राबविल्यानंतर कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी जंगलाविषयीचे कायदे मोडण्याची मोहीम हाती घेतली. ब्रिटीश सरकारने वनांमधील झाडे तोडणे, लाकूड तोडणे, वन उत्पादन गोळा करणे, राखीव वनातील गवत कापणे, गुरे चारणे, वनात शिकार करणे इत्यादी बाबींवर बंदी घातली होती. वन कायद्यातील या अन्यायकारक तरतुदींमुळे शेतकरी व आदिवासी यांच्यामध्ये असंतोष होता हा असंतोष लक्षात घेऊन मिठाच्या कायद्याप्रमाणे जंगलासंबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस समितीने घेतला

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोले तालुक्यातील डोंगराळ भाग हा जंगल सत्याग्रहास अनुकूल राहील असे महाराष्ट्र कॉंग्रेस प्रांतिक समितीस वाटू लागले. त्यासाठी समितीने या जंगल सत्याग्रहाच्या कार्याकरिता डॉ एक समिती स्थापन केली. जंगल सत्याग्रहाच्या तयारीसाठी लक्ष्मणशास्त्री जोशी आणि सरदेसाई यांनी महाराष्ट्र प्रांतिक समितीकडे २,००० रुपयांची मागणी केली. परंतु या मागणीस लवकर उत्तर न आल्याने वैकुंठलाल मेहता यांनी या सत्याग्रहासाठी १,५०० रुपयांची मदत केली. बापूसाहेब परेगावकर, भैयासाहेब कुलकर्णी, भाई दत्ता कुलकर्णी, रामकृष्ण महाराज व गणेश जोशी यांनी संगमनेर व अकोले भागात सत्याग्रहाच्या तयारीला सुरुवात केली. स्थानिक कार्यकर्त्यांनीही पुढाकार घेऊन सत्याग्रहासाठी राहुरी, बेलापूर, राहता या भागातून १,००० रुपयाहून अधिक किमतीचे धान्य जमा केले.

संगमनेर-अकोले येथील नियोजित जंगल सत्याग्रहाचे कार्यालय संगमनेर शहरातील गोरक्षण संस्थेच्या जागेवर सुरु करण्यात आले. संगमनेर तालुक्यासाठी भैयासाहेब कुलकर्णी आणि अकोले तालुक्यासाठी संत वकील यांची प्रमुख सत्याग्रह संचालक नेमणूक म्हणून करण्यात आली. तालुक्यात वनक्षेत्र असलेले राजापूर, आश्वी, पेमगिरी, पुतळे डोंगर, जवळे बाळेश्वर, भोजदरी, संगमनेर, सारोळे पठार, चंदनापुरी, सावरगाव घुले, कौठे वनकुटे, माळेगाव इत्यादी लहानमोठ्या गावांमध्ये सत्याग्रह केंद्रे निश्चित करण्यात आली. त्या प्रत्येक केंद्रावर एक गटप्रमुख व त्याच्या मदतीला पाच-सहा सत्याग्रहींची नेमणूक करण्यात केली. जंगल सत्याग्रहासाठी नेमलेल्या प्रचारकांनी तालुक्यात विविध लहानमोठ्या गावांमध्ये सत्याग्रहाचा प्रचार केला शेतकरी व आदिवासी लोकांना अन्यायी जंगल कायद्याची माहिती करून दिली आणि त्यांना या कायद्याविरुद्ध सत्याग्रह करण्यास तयार केले. जंगल सत्याग्रहाच्या पहिल्या टप्प्यात सरकारला वनचराई कर देण्याचे बंद करणे आणि जंगलात गुरे चरण्यास सोडण्याचे निश्चित करण्यात आले त्यानुसार गावोगावी शेतकऱ्यांची जनावरे अनिर्बंधपणे जंगलात सोडण्यात आली. पुढे गुरांचा कळप आणि त्यामागे कोयतेबंद गुराख्यांची टोळी असे दृश्य सर्वत्र दिसू लागले. जंगलातील हे दृश्य पाहून जंगल अधिकारी चक्रावले. त्यांनी सुरुवातीला पोलिसांच्या मदतीने जंगलातून गुरे हाकलण्याचे काम सुरुकेले. परंतु पोलिसांनी एका बाजूची गुरे हाकलून दिली तर सत्याग्रही दुसऱ्या बाजूने जनावरांचा कळप घेऊन जंगलात घुसत असत. या लपंडावात जंगल अधिकारी व पोलीस यांना हताश होण्याची वेळ आली. शेवटी पोलिसांनी जंगल सत्याग्रहाचे नेते रामकृष्ण महाराज यांना अटक केली

रामकृष्ण महाराज यांना अटक होताच त्यांच्यानंतर बापूसाहेब परेगावकर, वामनराव कुलकर्णी, श्री. ग. सरदेसाई, भाई सथ्थ्या व श्रीपाद नवरे यांनी एकामागोमाग एक असे या जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व केले परंतु त्यांनाही पोलिसांनीअटक केली. श्रीपाद नवरे यांच्या नेतृत्वात २३ जुलै १९३० रोजी संगमनेर व अकोले तालुक्यात आषाढी एकादशीच्या निमित्ताने एकाच वेळी वीस-बावीस ठिकाणी सत्याग्रह केला. कोपरगाव व राहुरी तालुक्यात ही या सत्याग्रहाचे लोण पोहचले. कायदेभंग करणाऱ्याला अटक करण्यासाठी पोलीस गेले तरशेकडो

लोक त्यांना प्रतिबंध करीत असल्याचे अनोखे दृश्य चंदनापुरी व सावरगावमध्ये दिसले सत्याग्रहाचे असे दृश्य बघून अधिकारी व पोलीस हताश झाले. त्यांना प्रेक्षकांच्या भूमिकेशिवाय काही करता आले नाही नंतर मात्र त्यांनी गावोगावच्या अनेक स्थानिक सत्याग्रहींना अटक करण्यास सुरुवात केली.

संगमनेर तालुक्यातील जंगल सत्याग्रह संपूर्ण महाराष्ट्राबरोबर भारतभर गाजला यामध्ये स्थानिक सत्याग्रहींबरोबरच बाहेरगावाहून आलेले अनेक सत्याग्रही सहभागी झाले होते. यातील अनेकांना पोलिसांनी अटक केली या सत्याग्रहाचे नेतृत्व करणारे प्रमुख नेते पकडले गेले. पोलिसांच्या दडपशाहीमुळे लोक भयभीत झाले. त्यांना प्रभावी नेत्यांचे पाठबळ उरले नाही अनेक स्थानिक सत्याग्रहींना अटक झाल्यामुळे उत्तरोत्तर ही चळवळ थंडावत गेली

## वैयक्तिक सत्याग्रह चळवळीत संगमनेर तालुक्याचा सहभाग

सन १९४० च्या रामगढ येथील अधिवेशानात म. गांधीनी वैयक्तिक सत्याग्रहासाठी सत्याग्रहींना नावे नोंदविण्याची सूचना केली होती. त्यानुसार प्रत्येक तालुक्यात वैयक्तिक सत्याग्रहासाठी नावे नोंदविण्यात येऊ लागले. संगमनेर तालुक्यात नोंदविण्यात आलेल्या नावांपैकी आमदार केशवराव देशमुख यांच्या पत्नी जयदेवीबाई देशमुख आणि वसंतराव पिंगळे यांचीवे वैयक्तिक सत्याग्रहासाठी प्रांतिक कॉंग्रेस समितीने निश्चित करून संगमनेर येथे वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे जाहीर केले त्यानुसार संगमनेरमध्ये वैयक्तिक सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. आजारपणामुळे ऐनवेळी वसंतराव पिंगळे सत्याग्रह करू शकले नाही त्यामुळे जयदेवीबाई देशमुख या स्वतः सत्याग्रहासाठी पुढे सरसावल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली शेकडोच्या संख्येने लोकसत्याग्रहात सहभागी झाले. सर्वांनी ब्रिटीश सरकारविरुद्ध घोषणा देत तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. तहसील कार्यालयासमोर पोलिसांनी आंदोलकांवर आश्रुधुराचा वापर केला त्यात काही मोर्चेकरी जखमी झाले. मोर्च्याचे नेतृत्व करणाऱ्या जयदेवीबाई ना पोलिसांनी अटक केली त्यांना तीन महिने कारावासाची शिक्षा झाली.

## 'चले जाव' आंदोलनात संगमनेर तालुक्याचा सहभाग

चले जाव आंदोलनाची घोषणा होताच सरकारने देशभर दडपशाही सुरु केली. त्यावेळी संगमनेर शहरातही १४४ कलम लागू करून जमावबंदीचा आदेश लागू करण्यात आलाहोता. संगमनेरमध्ये सरकारच्या या दडपशाहीचा निषेध करत लोक उत्साहाने रस्त्यावर उतरले. जमावबंदी आदेशाचा भंग करून शहरभर प्रभातफेऱ्या, सभा व मिरवणुका होऊ लागल्या. या सभा-मिरवणुकांना जनतेचा मोठा प्रतिसाद मिळू लागला. राष्ट्र सेवा दलाच्या संगमनेर शाखेचे प्रमुख भास्करराव दुर्वे आणि त्यांचे कार्यकर्ते या कार्यात आघाडीवर होते या कार्यकर्त्यांनी बुलेटीन वाटणे, पोस्टाच्या पेट्या पेटविणे, आजूबाजूच्या फोन तारा तोडणे इत्यादी कामे संगमनेर परिसरात करण्यास सुरुवात केली. चले जाव चळवळीचे लोण तालुक्यातील खेड्यापाड्यात जाऊन पोहचले तालुक्यात सरकारविरोधात सर्वत्र प्रचार पत्रके वाटली जाऊ लागली. सरकारी मालमत्तेचे नुकसान होऊ लागले. सरकारचा विरोध म्हणून तालुक्यातील अनेक गावातील पोलीस पाटलांनी आपल्या पाटीलकीचे राजीनामे दिले. सभा व मिरवणुकांमध्ये भाग घेतल्याबद्दल पोलिसांनी अनेकांना अटक केली आणि त्यांना शिक्षा सुनावण्यात आल्या.

## संगमनेर तालुक्यातील भूमिगत चळवळ

चले जाव आंदोलनातील आंदोलकांवर सरकारने दडपशाही सुरु केल्यावर अनेक आंदोलक भूमिगत झाले व भूमिगत चळवळ सुरु झाली. संगमनेरचे भास्करराव दुर्वे हे राष्ट्र सेवा दलाच्या संगमनेर शाखेचे प्रमुख होते.त्यांचे १९४२ च्या चळवळीत भूमिगत झालेल्या नेत्यांशी पूर्वीपासून मैत्रीचे संबंध होते त्यामुळे श्री. भास्करराव दुर्वे यांनीही संगमनेर अकोले भागात भूमिगत चळवळ करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी चळवळीत सहभागी होण्यासाठी बडोद्यावरून शिक्षण सोडून आलेले अण्णासाहेब शिंदे यांची मदत घेतली दोघांनीही संगमनेर-अकोले तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळीत काम करू इच्छिणाऱ्या अनेक तरुणांना संघटीत केले भास्करराव दुर्वे आणि आणि अण्णासाहेब शिंदे यांनी या तरुण कार्यकर्त्यांची एक गुप्त बैठक राजापूर येथे रामभाऊ हासे यांच्या वस्तीवर१५ ऑगस्ट १९४२ रोजी घेतली. या बैठकीत मार्गदर्शन करण्यासाठी पुण्यावरून आलेले वसंतराव तुळपुळे उपस्थित होते त्यांनी उपस्थित तरुणांना भूमिगत राहून चळवळ चालविण्यासाठी प्रेरित केले.

राजापूर येथील बैठकीतून प्रेरित होऊन भूमिगत कार्यकर्त्यांनी२३ ऑक्टोबर १९४२ रोजी संगमनेर मामलेदार कार्यालयावर मोर्चा काढून ते कार्यालय ताब्यात घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे मोर्चा काढणाऱ्या भास्करराव दुर्वे, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब

थोरात, पी. जी. भांगरे, पी. बी. कडू पाटील, धर्मा पोखरकर, बुवासाहेब नवले या प्रमुख नेत्यांना पकड समन्स निघाले त्यामुळे हे सर्व कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यांनी अकोले तालुक्यात पट्टा किल्याच्या पायथ्याशी असलेल्या वैतागवाडी येथे आश्रय घेतला वैतागवाडी येथे भूमिगत असताना भूमिगत कार्यकर्त्यांनी पट्टा किल्यावर जाऊन तिरंगा ध्वज फडकाविला. तसेच गुप्तपणे मुंबईला जाऊनसाने गुरुजींच्या भेट घेतली. मुंबईवरून परतल्यानंतर त्यांनी संगमनेर, राहुरी व श्रीरामपूर तालुक्यात विविध ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडण्याचे आणि खांब पाडण्याचे काम परिणामकारकरित्या पार पाडले. परंतु हळूहळू हे सर्व कार्यकर्ते पकडले गेल्याने तालुक्यातील भूमिगत चळवळ शांत झाली

## संगमनेर तालुक्यातील स्वातंत्र्योत्सव

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला संगमनेर शहरातील नागरिकांनी १४ ऑगस्ट १९४७ रोजीच्या सायंकाळी ‘भारत माता की जय, महात्मा गांधी की जय’ इ. घोषणा देत आनंदोत्सव मिरवणूक काढली. संगमनेर नगरपालिकेच्या वतीने सर्व म्युनिसिपल इमारती तसेच इतर सार्वजनिक व सरकारी इमारतींवर दिव्यांची रोषणाई करण्यात आली. १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीच काही नागरिकांनी एकत्र येत मामलेदार कचेरीसमोर तिरंगा ध्वज फडकवला. १५ ऑगस्ट रोजी सकाळी शहरातील सर्व शाळांमध्ये झेंडावंदन करण्यात आले शाळेतील विद्यार्थ्यांना लाडू वाटप करण्यात आले. शहरातील नागरिकांनी उस्फूर्तपणे रस्ते स्वच्छ करून आपल्या घरांसमोर रांगोळया काढल्याया दिवशी संगमनेर शहरात स्वातंत्रदिन उत्सव समितीमार्फत गोरगरीब लोकांना अन्नदान व लहान मुलांना मेवामिठाई वाटण्यात आली. काही ठिकाणी राष्ट्रीय पोवाडे गायन व कुस्ती स्पर्धा इत्यादी कार्यक्रम आयोजित आले.

काँग्रेस पक्षाच्या वतीने पहिल्या स्वातंत्र्यदिनी शहरातील नेहरू चौकात झेंडावंदनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. काँग्रेस तालुका कमेटीचे अध्यक्ष भैय्यासाहेब कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले१५ ऑगस्ट १९४७ रोजीच्या या पहिल्या स्वातंत्र्यदिनाचे चिरंतन स्मरण व्हावे या हेतूने संगमनेर नगरपालिकेने नेहरू चौकाच्या मध्यवर्ती ठिकाणी स्वातंत्र्य स्तंभ उभारण्याचा निर्णय घेतला. या स्तंभाचा कोनशीला समारंभ श्री जयराम मुरलीधर मालपाणी यांचे हस्ते करण्यात आला. २३ फुट उंच असलेल्या या स्तंभाचे बांधकाम एका वर्षात पूर्ण झाले १५ ऑगस्ट १९४८ रोजी दुसऱ्या स्वातंत्र्यदिनी नामदार हरिभाऊ पाटसकर यांचे शुभहस्ते या स्तंभाचे लोकार्पण करण्यात आले.

## समारोप:-

वरीलप्रमाणे विसाव्या शतकाच्या सुरवातीपासूनच अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात राष्ट्रीय चळवळीचे वारे वाहू लागलेले. तालुक्यातील जनतेने स्वदेशी चळवळ, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ आणि छोडो भारत चळवळ या प्रमुख राष्ट्रीय चळवळींमध्ये उस्फूर्तपणे सहभाग घेतलेला दिसून येतो. सन १९३० मध्ये तालुक्यात झालेला जंगल सत्याग्रह देशभरहोता.

## संदर्भ :-

१. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र (१९२१ – १९२९), खंड तिसरा, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००८.
२. पाठक विठ्ठल नाथ, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य-संग्राम, अहमदनगर संग्रालय प्रकाशन, अहमदनगर, १९९३.
३. डॉ. कुंटे भ. ग. (संपादक व सचिव), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश (खंड १), दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७९.
४. शेवाळे वि. म., सह्याद्रीच्या कुशीत, वनविहार प्रकाशन, संगमनेर, २००६.
५. कांदळकर राजा, नायक स्वातंत्र्यसेनानी भास्करराव उर्फ नाना दुर्वे यांचे चरित्र सा. भा. दुर्वे प्रतिष्ठान, संगमनेर, २०१०.